MHRT080000322022

**नियमीत दिवाणी दावा क्रमांक ०३/२०२२ मधील**
**निशाणी क्र.३१ खालील आदेश**

१. वादीने सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ रुल १७ अन्वये केलेला आहे.

२. वादीचे कथन असे की, प्रस्तुत दाव्यामध्ये प्रतिवादी नं. ७ चे नाव प्रणाली असे टंकलिखीत झाले आहे. तिचे नाव प्रियंका प्रकाश कदम असे आहे. सबब दाव्याच्या टायटलमध्ये नजरचुकीने झालेल्या दोष निवारण करण्यासाठी दावा दुरुस्ती करणे गरजेचे आहे. सबब वादीला सदरची दावा दुरुस्ती करणेची परवानगी मिळावी. सदरच्या दुरुस्तीमुळे प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. त्याचप्रमाणे दाव्याचे स्वरुप बदलेले जाणार नाही. सबब वादीने अर्ज मंजुर करावा अशी विनंती केली.

३. प्रतिवादीने सदरच्या अर्जास म्हणणे दाखल केले आहे व दुरुस्तीस हरकत घेतली आहे. वादीनी प्रतिवादीच्या म्हणण्याप्रमाणे अर्जातील कारण संयुक्तिक नाही. अर्ज विलंबाने केलेला आहे. सबब अर्ज नामंजुर करण्यात यावा.

४. अर्ज व अर्जातील कथने व त्यामधील म्हणणे यांचा सारासार विचार केला. दोन्ही बाजुच्या विधीज्ञाचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुतची दुरुस्ती केवळ तांत्रिक स्वरुपाची आहे. सदरचा दावा वादीने प्रतिवादीविरुध्द निरंतर मनाईच्या आदेशाकरिता केलेला आहे. सदरची दुरुस्ती मंजूर केल्यास दाव्याच्या स्वरुपात बदल होवू शकत नाही. सबब खालील आदेश पारीत करण्यात येतो.

**नि.दि.दा.क्र.३/२०२२**

# आदेश

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. वादीने सदरची दावा दुरुस्ती ही १४ दिवस अथवा पुढील तारखेस दावा दुरुस्ती न केल्यास सदरचा आदेश रद्द करणेत येईल. सबब वादीने नेमलेल्या तारखेला दावा दुरुस्ती करुन प्रत दाखल करावी.

SHRUTI HANUMANTRAO PATIL

Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2022.10.18 17:06:12 +0530

**दिनांक : १८.१०.२०२२.**
**ठिकाण : देवरुख.**

**(श्रुती ह.पाटील)**
**सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,**
**देवरुख.**

## CERTIFICATE

order in R.C.S. no. 03-2022

I affirm that the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original order/judgment/evidence.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | T. N. Khade (Jr. Clerk) |
| Court name | : | Jt. Civil Judge, J. D. and J.M.F.C., Deorukh. |
| Date | : | 18/10/2022 |
| Order signed by the presiding officer on | : | 18/10/2022 |
| Order uploaded on | : | 18/10/2022 |